नि.१०६ खाली आदेश

१. सदर वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्रं ३ चे वारस म्हणून दाव्यात सामील करणेस झालेला विलंब माफ करणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, दाव्यातील वादी क्रं ३ कै. सुरेश सोनबा वीर हे दि. ०२/०३/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. सदरील वादीचे वारस दाव्याचे कामी दाखल होणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरील वादीचे वारस वादी मयत झाल्यानंतर त्यांना काही कारणामुळे व कायदयाची जाण नसलेमुळे मयताचे वारस दाव्याचे कामी कळवावे लागतात यांची माहीती वादीचे वारसांना नव्हती. सदर मयत वादीचे मृत्युची व तिचे वारसांबाबत माहीती वकिलांना वादीचे वारसांकडुन वेळेत मिळाली नाही. त्यामुळे सदर मयत वादीचे वारस दाव्याचे कामी वेळेत दाखल करता आले नाहीत. सदरचा सदरचा विलंब हा हेतू पुरस्सर झालेला नसुन त्यांना काही कारणास्त व कायदयाची जाण नसलेने झालेला आहे. सदरचा विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले की, सदर प्रकरण हे पुराव्याकामी प्रलंबित असुन वादी यांनी सदरचा विलंब माफ करण्यासाठी संयुक्तीक असे कारण दिले नसल्याने सदर विलंब माफीचा अर्ज खर्चासह रदद करण्याची मागणी केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यातील वादी क्रं ३ कै. सुरेश सोनबा वीर हे दि.०२/०३/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. सदरील वादीचे वारस दाव्याचे कामी दाखल होणे न्यायाचे व गरजेचे आहे. वादीचे वारसांनी दाव्यामध्ये नमुद केलेले कारण त्यांना वादीचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब दर्शविण्याकरिता काही अंशी समाधानकारक आहे. दाव्याचे स्वरुप ध्यानात घेता वादीने नमूद केलेली कारणे सदरचा विलंब माफ करण्यायोग्य आहे. सदरचा विलंब माफ न केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच वादी चे वारस दाव्यामध्ये सामील केल्यास सदरचा दावा गुणदोषावर

चालविण्यास मदत होणार आहे. वादीने विलंब माफीकरिता नमुद केलेली कारणे ही विलंब माफ करण्याकरिता समाधानकारक व संयुक्तीक आहेत. सबब वरील सर्व परिस्थिती, कारणमिंमासा व न्यायाचे उददिष्ट ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे उचित होईल. त्याप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येतो:

आदेश

१. अर्ज (नि.१०६) मंजूर करण्यात आला.

२. वादीस वादी क्रं ३ चे वारस दाव्यात सामील करण्यास झालेला विलंब माफ करण्यात आला.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर

दिनांक :०४/०८/२०२२